ePaper
म्हणून एकनाथ शिंदे कर्नाटकात प्रचारासाठी गेले": शरद पवार



वर्ष - 7 । अंक -14 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- मुंबई-पुणे महामर्गावर भयंकर प्रकार!
- पुणेकरांनो, मुलांना सांभाळा!
- बाणेर-बालेवाडी लवकरच 'टँकरमुक्त'!

www.mahaenews.com । बुधवार, दि. 10 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# तर मोदीही जेलमध्ये जातील!

## ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर साधला निशाणा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. केंद्रातील सत्ता गेल्यास नरेंद्र मोदीही तुरुंगात जाण्याची शक्यता असल्याचा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. पिंपरीत वडार समाजाच्या मेळाव्याला ते उपस्थित राहिले होते. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मोदींवर टीका केली आहे.**



प्रकाश आंबेडकर म्हणाले की, "राजकारणातील चोरांना पंतप्रधान नरेंद्र मोदी पकडत आहेत. पण, त्यांचे पकडणे मी गैर मानतो. कारण, पकडल्यावर ती प्रकरणे पूर्ण न होता, तीन ते चार वर्षे कारागृहात ठेवून भीतीचे वातावरण निर्माण केले जाते. हे मानसिकतेवर आघात करण्याचे धोरण आहे. कर्नाटक, केंद्रातील सत्ता गेल्यास नरेंद्र मोदीही तुरुंगात जाऊ शकतात. जे पेरलेले असते, तेच उगवते. त्यामुळे मोदी यांनी जे पेरले, तेच उद्याच्या राजकारणाचा भाग होण्यासारखी परिस्थिती मला दिसत आहे."

यावेळी त्यांनी अजित पवार भाजपमध्ये जाणार का या चर्चांवर देखील भाष्य केले आहे. "राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी दोनवेळा भाजपमध्ये जातो असे वातावरण निर्माण केले. त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांनी प्रतिक्रिया दिली. ते दोन्हीवेळा बोलले आणि त्यांनी दोन्हीवेळा घुमजाव केले. देशभरात उरलेले सर्वजण घाबरत असले तरी अजित पवारांनी या दोघांनाही फसवले, कोणाला कधी, कुठे मुख्यमंत्रिपद चिकटेल त्यावर अजित पवार भाजपमध्ये जातील की नाही हे अवलंबून असेल," असेही ॲड. आंबेडकर म्हणाले.

यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी वडार समाजाला मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली. भटक्या विमुक्तांमध्ये वडार समाज हा ४० टक्के आहे. वडार समाजाची अवस्था ही खालवलेली असल्याने शासनाने या समाजाला इतरांच्या बरोबरीने येण्यासाठी मदत करावी. शिक्षणाच्या संधीबरोबरच कला जोपासणाऱ्या समाजाला अनुदानाच्या रुपाने मदत केली पाहिजे, असेही डॉ. आंबेडकर यांनी शासनाला आवाहन केले.

### वडार समाजातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने घ्यावी...

ॲड. प्रकाश (बाळासाहेब) आंबेडकर म्हणाले की, वडार समाजाने लढाईला सुरुवात केली आहे. वडार समाजाकडे कलाकृती आहे. जात्यासह विविध अवजारे हा समाज बनवतो. पण, त्याचा प्रचार करता आला नाही. भटक्या विमुक्त जातींना ब्रिटीशांच्या काळापासून गुन्हेगारी जमात ठरवले गेले. मात्र, त्या काळातही हा समाज ब्रिटिशांना शरण गेला नाही. त्यातूनच आर्थिक आणि मानसिक दृष्ट्या हा समाज खचला आहे. राजकीय पक्ष भटक्या, विमुक्तांना थारा देणार नाहीत. कारण, संधी मिळाली तर, हा समाज पुढे जाईल, अशी भीती त्यांना वाटते.

त्यासाठी आपले वेगळेपण दाखवा. या प्रस्थापित पक्षांची साथ सोडा. ते उमेदवारी घे म्हणत आपल्या दारात येतील, असे आवाहन केले. दरम्यान, भटक्या विमुक्त समाजातील वडार समाजातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे. त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सरकारने त्यांना अनुदान दिले पाहिजे, अशी मागणीही आंबेडकर यांनी केली.

### नरेंद्र मोदी यांची वृत्ती त्या दारुड्याप्रमाणे

»माजी पंतप्रधान नरसिंहराव यांच्या काळात देशातील सोनं बँक ऑफ इंग्लंडमध्ये गहाण ठेवले होते. मी अनेकवेळा विचारलं ते सोनं परत आणलं का? पण त्यावर कुणी उत्तर देत नाही. यावरुन देशाची परिस्थिती काय आहे ते बघा. आपल्या घरातलं सोनं जेव्हा आपण गहाण ठेवतो आणि ते सोडवता येत नाही. त्यावरुन आपले घर आर्थिकदृष्ट्या दुबळे असल्याचा निष्कर्ष काढला जातो. एखादा दारूडा अशावेळी घरातली भांडीकुंडी विकून घर चालवतो. सगळं विकून झालं की दारूडा आपलं घरही विकून टाकतो. आज नरेंद्र मोदी नेमके तेच करतायत की नाही सांगा? असा प्रश्न उपस्थित करत प्रकाश आंबेडकर यांनी टीका केली. यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे मात्र कौतुक केले. नेहरू यांनी अत्यंत कष्टाने देश उभा केला असे सांगताना ते म्हणाले की, डॉ. होमी भाभा यांच्या संशोधनाच्या आधारावर नेहरूंनी देशात कारखाने उभे केले. तेच कारखाने आज भारताचा आर्थिक कणा आहेत. मात्र तेच कारखाने मोदी दारूड्यासारखा विकायला लागला आहे, अशी जळजळीत टीका आंबेडकर यांनी केली.



### माझ्या 4 प्रश्नांची उत्तरे मोदींनी देऊन दाखवावी

घर चालवायला आपल्याला हजार रुपये लागत असतील आणि आपली कमाई ८०० रुपये असेल तर वरचे २०० रुपये कर्ज काढावे लागतात. त्याप्रमाणेच आज नरेंद्र मोदी कर्ज काढून देश चालवत आहेत. या कर्जासाठी कारखाने विकण्याचा सपाटा त्यांनी सुरु केला आहे. मला आणि पंतप्रधान मोदींना एकाच व्यासपीठावर बसवा. मी त्यांना चार प्रश्न विचारतो, त्यांनी त्याची उत्तरे देऊन दाखवावीत किंवा मोहन भागवत यांनी तरी समोर यावे. आर्थिक दृष्टीकोनातून या देशाचे वाटोळं करण्याचं काम सुरु आहे.

### म्हणून अंबानी देश सोडून गेला

ज्या वाझेने बॉम्ब ठेवला त्याच वाझेला आता माफीचा साक्षीदार केले जाणार आहे. आपल्या वाघू मारणाऱ्याला पोलिसांनी पकडल्यानंतर त्याच आरोपीला माफीचा साक्षीदार केल्यानंतर आपल्याला न्याय मिळेल का? हेच अंबानीला लक्षात आले आहे. मोदींच्या व्यवस्थेत आपल्याला न्याय मिळणार नाही, त्यामुळे ते देशच सोडून गेले.

### प्रस्थापितांची साथ सोडा

आर्थिक आणि मानसिक दृष्ट्या हा समाज खचला आहे. या परिस्थितीत राजकीय पक्ष भटक्या, विमुक्तांना थारा देणार नाहीत. त्यासाठी आपले अस्तित्व राखण्याकरिता येणाऱ्या निवडणुकांमध्ये प्रस्थापित राजकीय पक्षांची साथ सोडा आणि आपले वेगळेपण दाखवून द्या.

# 16 हजार पुणेकरांचा वीजपुरवठा खंडित!

## तीन महिन्यांचे वीजबिल थकीत ; आणखी 72 हजार ग्राहकांवर कारवाईचा बडगा

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महावितरणच्या पुणे परिमंडलामध्ये गेल्या तीन महिन्यांपासून वीजबिल न भरणाऱ्या १६ हजार ४१३ घरगुती तसेच वाणिज्यिक व औद्योगिक थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. तर, आणखी ७१ हजार ९८ थकबाकीदारांची वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे. वीजग्राहकांनी थकीत बिलांचा ताबडतोब भरणा न केल्यास वीजपुरवठा खंडित करण्याच्या नियमित कारवाईसोबतच ही धडक मोहीम महावितरणकडून सुरू आहे. यात पुणे शहरातील ६ हजार ५३६ ग्राहकांचा समावेश आहे.**



पुणे परिमंडलामध्ये तीन महिन्यांपासून विजेचे एकही बिल न भरणाऱ्या घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक थकबाकीदारांची यादी तयार करण्यात आली आहे. यामध्ये पाचशे रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या ८७ हजार ५११ वीजग्राहकांनी तीन महिन्यांत एकही वीजबिल भरलेले नाही. त्यांच्याकडे ४२ कोटी ६३ लाख रूपयांची थकबाकी असल्याचे निदर्शनास आले. ज्या ग्राहकांनी थकीत बिलांचा भरणा केला नाही त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्याची विशेष मोहीम गेल्या एप्रिलपासून सुरु करण्यात आली आहे. यामध्ये १३ कोटी ३७ लाख रूपयांच्या थकबाकीपोटी आतापर्यंत १६ हजार ४१३ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. तर, आणखी ७१ हजार ९८ ग्राहकांकडे २९ कोटी २८ लाख रूपयांची थकबाकी आहे. त्यांचाही वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे.

पुणे शहरात अशा २६ हजार ७९६ ग्राहकांकडे ११ कोटी ८१ लाख रूपयांची थकबाकी आहे. त्यातील ६ हजार ५३६ ग्राहकांचा ४ कोटी ७१ लाखांच्या थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे तर, उर्वरित २० हजार २६० ग्राहकांकडे थकीत ७ कोटी १२ लाख रुपयांची थकबाकी आहे. पिंपरी चिंचवड शहरात १६ हजार ३०० ग्राहकांनी गेल्या तीन महिन्यांपासून १० कोटी ९१ लाख थकीत बिलांचा भरणा केलेला नाही. आतापर्यंत तीन हजार २०९ वीजग्राहकांचा ३ कोटी ५० लाखांच्या थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे तर आणखी १३ हजार ९१ ग्राहकांकडे ७ कोटी ४१ लाखांची थकबाकी आहे. थकीत वीजबिलांचा ताबडतोब भरणा करून सहकार्य करावे आणि वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई टाळावी असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

### सात तालुक्यांत 20 कोटी थकबाकी


**जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, मावळ, खेड, मुळशी, वेल्हे, हवेली तालुक्यांमध्ये ४४ हजार ४१५ घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वीजग्राहकांनी १९ कोटी ९१ लाख रूपयांच्या थकीत बिलांचा भरणा केला नाही. त्यातील ६ हजार ६६९ ग्राहकांचा वीजपुरवठा ५ कोटी १६ लाखांच्या थकबाकीपोटी खंडित करण्यात आला आहे. तर, उर्वरित ३७ हजार ७४७ वीजग्राहकांकडे १४ कोटी ७५ लाखांची थकबाकी आहे.**

# शिक्षक भरतीसाठी ऑगस्टपर्यंत प्रतीक्षा!

## उमेदवारांना आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी राज्यात शिक्षक भरती केली जाणार असल्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी जाहीर केले आहे. मात्र संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच शिक्षक भरती प्रक्रिया होणार असून, शिक्षण विभागाच्या वेळापत्रकानुसार शिक्षक भरती प्रक्रिया ऑगस्टमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उमेदवारांना आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे.**



राज्यात ३० हजार शिक्षकांच्या भरतीची घोषणा करण्यात आली आहे. मात्र अभियोग्यता आणि बुद्धिमापन चाचणीचा निकाल जाहीर होऊनही प्रत्यक्ष भरती प्रक्रिया सुरू झालेली नाही. या पार्श्वभूमीवर शिक्षक भरतीबाबत उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने भरती प्रक्रियेचे वेळापत्रक शिक्षण विभागाकडून तयार करण्यात आले आहे. त्यानुसार शाळांची संचमान्यता १५ मेपर्यंत अंतिम केली जाणार आहे.

संचमान्यतेनंतर बिंदूनामावली प्रमाणित करणे, शिक्षकांच्या रिक्त पदांची नोंद पवित्र संकेतस्थळावर करणे, पहिल्या तिमाहीसाठीच्या जाहिरातींनुसार मुलाखतीशिवाय आणि मुलाखतीसह पदभरतीसाठी पात्र उमेदवारांकडून प्राधान्यक्रम घेणे, शिफारस करणे आदी प्रक्रिया २० ऑगस्टपर्यंत करण्यात येईल. शिक्षक भरती प्रक्रियेसाठी आवश्यकतेनुसार तीन महिन्यातून एकदा व्यवस्थापनाकडून पवित्र प्रणालीवर रिक्त पदांसाठीच्या जाहिराती घेतल्या जातील. तसेच पात्र उमेदवारांची व्यवस्थापननिहाय यादी नियुक्तीच्या शिफारसीसाठी प्रसिद्ध करण्यात येईल.

या पूर्वीच्या १२ हजार ७० पदांच्या भरतीत विविध कारणांनी रिक्त राहिलेल्या एकूण १ हजार ५०० जागाही आता भरण्यात येणार आहे. त्या पदभरतीद्वारे एकूण ७ हजार ९०३ रिक्त पदांवर भरती करण्यात आली आहे.

# पुण्यात दर गुरुवारी पाणीबंद; १८ मेपासून अंमलबजावणी

। पुणे । महाईन्यूज ।

मोसमी पावसावर यंदा एल-निनोचा प्रतिकूल परिणामाची शक्यता विचारात घेऊन अखेर शहरात पाणी कपात करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला. या निर्णयाची अंमलबजावणी पुढील आठवड्यापासून (१८ मे) होणार आहे. आठवड्यातून एकदा म्हणजे दर गुरुवारी संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा बंद ठेवला जाणार आहे.

खडकवासला धरणसाखळीतील उपलब्ध पाणीसाठा विचारात घेऊन महापालिकेने मे, जून आणि जुलै महिन्यातील पाणी पुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी पाणीकपातीचा निर्णय घेतला. महापालिका आयुक्त विक्रम कुमार आणि पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी मंगळवारी ही माहिती दिली. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच कालवा सल्लागार समितीची बैठक झाली. तसेच यापूर्वी जलसंपदा



विभागाबरोबरच झालेल्या बैठकीत पाणी कपातीवर चर्चा झाली होती. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, आठवड्यातून एक दिवस पाणी बंद ठेवल्यानंतर त्याचा परिणाम पुढील दोन ते तीन दिवसांच्या पाणी पुरवठ्यावर होतो. जलवाहिन्यांत 'एअर ब्लॉक' मुळे पाणी पुरवठा विस्कळित होतो. ही अडचण दूर करण्यासाठी 'एअर व्हॉल्व' बसवून तो सुरळीत होऊ शकत असल्याचे निदर्शनास आले आहे. एक दिवस पाणी पुरवठा बंद ठेवल्यानंतर दुसऱ्या दिवशी ज्या भागातील पाणी पुरवठा विस्कळित होतो, अशी २० ठिकाणे महापालिकेने निश्चित केली आहेत. त्या ठिकाणी 'एअर वॉल्व्ह' बसविण्यात आले आहेत.

# संत तुकाराम महाराज पालखी मार्गाची तीन टप्प्यात पाहणी!

## येत्या 10 जूनला पालखीचे श्रीक्षेत्र देहूगाव येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान...

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांची पालखी येत्या १० जून रोजी श्रीक्षेत्र देहूगाव येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देहू देवस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, पालखी सोहळा प्रमुख संजय महाराज मोरे, भानुदास महाराज, माणिक महाराज मोरे, विशाल महाराज मोरे आदींनी संत तुकाराम महाराज पालखी मार्गाची तीन टप्प्यात पाहणी पूर्ण केली. या तीन टप्प्याच्या पाहणीत पालखी विसावा आणि पालखी सोहळा मुकाम स्थळाची तसेच पालखी मार्गाची पाहणी केली. या पाहणीदरम्यान अकलूजचे तहसीलदारदेखील देहू देवस्थानच्या विश्वस्तांसोबत होते.**



या पाहणीत ज्या ज्या अडचणी आल्या. त्याबाबत पुणे जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांना प्रत्यक्ष भेटून सांगितल्या. त्याप्रमाणे पुणे जिल्हाधिकारी देशमुख यांनी ज्या ज्या समस्या येतात, अशा सर्व समस्या सोडविण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत.

सध्या उन्हाळा कडक असल्याने पाण्याची आवश्यकता मोठ्या प्रमाणात भासणार आहे. त्यासाठी पाण्याचे टँकर वाढवावेत, पुरेशा प्रमाणात औषधी उपलब्ध करण्यात यावीत. तसेच फिरत्या शौचालयांची संख्या वाढवावी, अशी मागणी देहू देवस्थान संस्थानच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त देहू देवस्थानच्या मंदिराच्या वतीने रंगरंगोटीचे काम हाती घेण्यात आले होते. हे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. सर्व दिंड्यांना पालखी प्रस्थान सोहळ्याच्या तयारीबाबत पत्रद्वारे कळविण्यात येत आहे. रथाची चकाकी करणाऱ्या कारागिरांना पूर्वसूचना देण्यात आली आहे, अशी माहिती देहू देवस्थान संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी दिली.

### वारकऱ्यांना सोयी सुविधा पुरविणार...



पालखी सोहळा प्रस्तानाला आता अवघा एक महिना राहिला आहे. पालखी सोहळ्याच्या अगोदरपासून वारकरी मोठ्या संख्येने देहूत दाखल होतात. त्यामुळे देहू गावातही वारकऱ्यांना सोयी सुविधा पुरविण्यात येणार आहे. त्यासाठी देहू नगरपंचायतीकडूनही तयारी सुरू आहे. साफसफाई आणि शुद्ध पाण्याचा पुरवठा याकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. वारकऱ्यांसाठी फिरती शौचायलेही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# 'दि केरला स्टोरी'चा पिंपरी-चिंचवडमध्ये 'मोफत शो'

## आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

### धर्मांतरापासून हिंदू मुलींना वाचवण्याचे केले आवाहन

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**धर्मांतरावर आधारित 'दि केरला स्टोरी' या चित्रपटाचे पिंपरी-चिंचवडमध्ये तीन शो मोफत दाखवण्यात येणार आहेत. यासाठी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. तसेच, धर्मांतरापासून हिंदू मुलींना वाचवण्याचे केले आवाहन त्यांनी केले आहे.**

चिंचवडमधील सिटी वन मॉलमधील पी.व्ही.आर. सिनेमागृहात गुरूवारी, दि. ११ मे रोजी 'दि केरला स्टोरी' चित्रपटाचे मोफत शोचे नियोजन केले आहे. 'द केरळ स्टोरी' हा चित्रपट ५ मे पासून थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाचे निर्माते सुदिप्तो सेन असून, चित्रपटाचे दिग्दर्शक विपुल शाह आहेत, यांनी दाखवलेली हृदय पिळवटून टाकणारी कथा प्रेक्षकांच्या चिंतन करायला लावणारी आहे. सर्व धर्मातील निरपराध महिलांना कधी प्रेमाने, तर कधी धमक्या देऊन कसे इस्लाम धर्मात धर्मांतरित केले जाते हे दाखवले आहे. यासाठी समाजप्रबोधनाचा भाग म्हणून आमदार लांडगे यांनी या चित्रपटाचे तीन शो मोफत आयोजित केले आहेत.

आमदार लांडगे म्हणाले की, धर्मांतर, लव्ह जिहाद यासारख्या घटना समाजिकदृष्ट्या आव्हानात्मक होत आहेत. याबाबत जाणीव आणि जागृती व्हावी. माता- भगिनी अशा कुप्रवृत्तीपासून दूर रहाव्यात, अशी आमची भावना आहे. राज्य सरकारने धर्मांतर, लव्ह जिहाद रोखण्यासाठी कायदा करावा, अशी मागणीही आम्ही विधानसभा अधिवेशनात केली होती.





> लव्ह जिहाद आणि धर्मांतर या लग्नाचे आमीष, प्रेमाचे आमीष किंवा नोकरीचे आमीष दाखवून मुलींची दिशाभूल केली जाते आणि त्यांच्यावर अत्याचार केले जातात. ही बाब समाजातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजे. मध्यतंरी लव्ह जिहाद आणि धर्मांतर, गोहत्याबंदी बाबत शहरात विराट मोर्चा काढण्यात आला होता. आळंदीत एक धर्मांतराचा प्रकार आम्ही उधळून लावला होता. आपल्या माता-भगिनी सुरक्षित राहण्यासाठी प्रबोधनात्मक उपक्रम म्हणून आम्ही हा शो मोफत ठेवला आहे.
>
> - महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# समलैंगिक पालकत्वाची गुंतागुंत




स्पॅनिश कवयित्री इव्हा बाल्तसार यांची ‘बोल्डर’ ही गेल्या वर्षी इंग्रजीत अनुवादित झालेली कादंबरी. मूळ स्पॅनिश भाषेत असलेल्या या कादंबरीचा इंग्रजीत अनुवाद जुलिया सॅन्से यांनी केला आहे. या कादंबरीची ‘बुकर’ आंतरराष्ट्रीय पुरस्काराच्या २०२३च्या दीर्घ यादीत निवड झाली आहे. त्यांची पहिली कादंबरी ‘परमाफ्रॉस्ट’मधील भाषा स्पष्ट आणि उपरोधिक असली, तरी त्यापेक्षाही काकणभर जास्त धीट भाषेचा वापर ‘बोल्डर’ या कादंबरीत आहे.

समलैंगिक जोडपे म्हटले, की ते दिवसभर प्रणयधुंद असतात, असे दाखवले जाते. त्यांनाही पोट-पाणी आहे, त्यासाठी त्यांनाही कामधंदा करावा लागतो. संसारिक जबाबदारी त्यांच्याही खांद्यावर असते. त्यांनाही पालक व्हावेसे वाटते. ‘बोल्डर’ची भाषा अत्यंत धीट, सडेतोड, तर काही ठिकाणी शिवराळ आहे. बोल्डर ही बाविशीतली भटकी (नॉर्मेडिक) तरुणी आहे. व्यवसायाने ती उत्तम आचारी आहे. समसा नावाच्या एका तरुणीशी, एका बेटाच्या बंदरावर बोल्डरची भेट होते. बोल्डर आपले घर सोडून त्या बेटावर राहायला आलेली असते. ती समसाच्या प्रेमात पडते. दोघीही एकमेकींचा यथेच्छ सहवास उपभोगतात. असे सर्व छान छान सुरू असताना, एक-दोन वर्षांनंतर बोल्डरचे आयुष्य महत्त्वाचे वळण घेते. समसाला आई व्हावेसे वाटते! समसाच्या या निर्णयाचा फार गंभीर परिणाम बोल्डरवर होतो. तिला कोणतेही बंधन नको असते. समसा आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे गर्भधारणा करवून घेते. बोल्डरला हा निर्णय फार पटलेला नसतो. समसा एका मुलीला जन्म देते; तिचे नाव टीना. टीनाच्या जन्मानंतर बोल्डरला या नात्याचा खूपच असुरक्षितता वाटू लागते. बोल्डरला टीना ही समसाच्या प्रेमात आलेली वाटेकरी वाटू लागते. बोल्डर टीनाचा द्वेष करीत नाही; पण तिला तिच्याविषयी ममत्वही वाटत नाही. अशा दोन परस्परविरुद्ध भावनांच्या कात्रीत ती सापडते. बोल्डर




ही कोंडी फोडण्यास असमर्थ आहे. कोंडीत सापडल्यामुळे तिला समसासोबत राहणे, संसारिक जबाबदाऱ्या उचलणे, नाही तर समसाचे घर सोडून पूर्वीचे भटके जीवन पुन्हा सुरू करणे, यांपैकी एकाची निवड करणे भाग असते.

आपल्या जीवनात बोल्डर एक निर्वात पोकळी अनुभवते. समसाच्या येण्याने तिला जो आनंद झालेला असतो, तिला जे हलके वाटू लागलेले असते, त्याची जागा आता जडपणा घेतो. एखाद्या पुरुष पतीप्रमाणे जबाबदाऱ्या उचलाव्यात, अशी समसाची अपेक्षा असते. एका ठिकाणी वैतागून बोल्डर म्हणते, ‘सेक्स ही सर्वांत सोपी; पण असत्य गोष्ट आहे. ज्या गोष्टीला आपण आत्मा म्हणतो आणि जी गोष्ट प्रेमाच्या सामायिक कक्षेत राहते असे वाटते, ती गोष्टही खरी नाही.’ इतके तिचे मन कडवट झालेले असते. बोल्डरचा स्वभाव मुक्त प्रणय, मजा करणे, कोणत्याही बंधनात न अडकणे असा आहे, तर समसा कुटुंबवत्सल आहे. टीनाच्या जन्मानंतर बोल्डर खूपच बदलते. तिचा समसासोबत राहण्यातला रसच संपतो. मुक्त प्रणयासाठी ती त्या बेटावरील दुसऱ्या एका मुलीशी संबंध जोडण्याचा अयशस्वी प्रयत्न करते. समसा आणि बोल्डरमधील अंतर दिवसेंदिवस वाढत जाते. भारतात आता कायद्याने समलैंगिक संबंधांना मान्यता आहे. या जोडप्यांपैकी कोणाला आई व्हावेसे वाटले, तर प्रगत वैद्यकीय शास्त्राची मदत घेऊन ते मातृत्व अनुभवू शकतात. आपला समाज अजूनही असे संबंध मोकळेपणाने स्वीकारण्यास तयार नाही.

त्याचप्रमाणे बहुतेक वेळा नवविवाहित स्त्रीवर मातृत्व लादले जाते. आपल्या इच्छेनुसार आई व्हावे, असे वाटणारा स्त्रियांचा मोठा वर्ग आहे; परंतु घरगुती समारंभांत नातेवाइकांकडून त्या स्त्रीला, ‘काय मग, कधी पाळणा हलणार,’ विचारले जाते. हे टाळण्यासाठीही त्या मातृत्व स्वीकारतात. बोल्डर ही गोष्ट पालकत्वाची किंवा मातृत्वाची नाही, तर बदलत जाणाऱ्या नातेसंबंधांची आहे. शेवटी बोल्डरला उमजते, की ते लहान मूल आपले शत्रू नसून, आपण पालक असल्याचे ज्या समाजाला सतत दाखवत आहोत, तो समाजच आपला खरा शत्रू आहे.

## संपादकीय »

### नवा राजा, नव्या अपेक्षा...

***तुम्ही कुठे जन्म घेता याला निव्वळ अपघातापलीकडे फार महत्त्व नसते. मृत्यूकालीन लौकिक ही तुमची खरी मिळकत समजली जाते. जगण्याचे निकष काय असावेत, याविषयी जगात अनेक प्रवाद आहेत..***

ब्रिटनच्या सिंहासनावर राजे चार्ल्स तृतीय यांचा भव्यदिव्य राज्याभिषेक सोहळाही पार पडला. तेथील जामानिमा वलयांकित असतो. बहुतांश पिढीही राजशिष्टाचाराबाबत कमालीची एकनिष्ठ असते. राजघराण्याच्या झगमगाटावर कोट्यवधींचा खर्च झाला, तरी बेहत्तर; मात्र खानदानी परंपरेला तडा जाऊ न देण्याची धारणा ब्रिटनमध्ये आत्मीयतेने जपली गेली. आपले खानपान, संस्कृती, वारशाबद्दल ते केवळ दक्ष आहेत असे नाही, तर ही कीर्ती जगभरात पोहोचावी, या श्रद्धेतून त्यांची धडपड सुरू असते. राजानियंत्रित लोकशाहीचा मार्ग ब्रिटनने निवडला, तो त्यातूनच. सन १९३७ नंतर ब्रिटनला पहिल्यांदाच राजा लाभला. नवे राजे ७४ वर्षांचे आहेत. त्यांच्यासोबत राणी म्हणून त्यांची पत्नी कॅमिला यांचेही पदग्रहण झाले. भारतीय वंशाचे ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी बायबलचे पठण करून, नवसम्राटांचे अभीष्टचिंतन केले.

**अनधिकृत बांधकामांना अभय देण्याचे काम अनेक स्तरांवर होत असते. अनेकदा कारवाईचा दिखावा करून त्यानंतर पुन्हा तीच परिस्थिती होते. एखाद्या बांधकामावर कारवाई केल्यानंतर अन्य अनधिकृत बांधकामांचे काय, असाही प्रश्नही अशावेळी उपस्थित होतो. त्यामुळे अनधिकृत बांधकामांचे इमलेच्या इमले उभे राहिले आहेत.**

## अनधिकृत बांधकामांचे इमले!

मुंबईतील अनधिकृत बांधकामे हा नेहमीच चर्चित मुद्दा राहिला आहे. अशी बांधकामे सरकारी जमिनीवर असोत, किंवा रेल्वे, पालिका हद्दीत; त्यांविषयी सर्वसामान्यांना अनेक प्रश्न पडतात. अशा बांधकामांवर कारवाई होते, मात्र ती तात्पुरतीच. ही बांधकामे करताना त्यामागील अर्थकारण, पर्यावरणाची होणारी हानी या सर्वच गोष्टी दुर्लक्षित केल्या जातात.

अनधिकृत बाधकामांवर राज्य सरकार, या बांधकामांचा भाग असलेले लोकप्रतिनिधी तोडगा काढतात आणि कायद्याच्या पळवाटा शोधल्यानंतर ही बांधकामे तशीच कायम राहतात. भले या बांधकामांमुळे पर्यावरणाची हानी झाली तरीही चालेल, मात्र कमाईसाठी अशी ती उभारण्याची स्पर्धाच जणू सुरू आहे. हेच इमले मुंबईतील बॉलिवूडमध्येही उभे राहू लागले आहेत. त्याचे उदाहरण म्हणजे मालाड मढ परिसरात चित्रिकरणासाठी उभे राहिलेले स्टुडिओ, बंगले. ही बांधकामे नेमकी कोणाच्या आशीर्वादाने उभी राहिली, यामागील खरा सूत्रधार कोण, समुद्रालगत बांधकामे उभी राहताना पर्यावरणाचा न केलेला विचार, यामागील अर्थकारण असे अनेक प्रश्न यानिमित्त उपस्थित होत आहेत.

मालाड मढ, वर्सोवा परिसराला लाभलेला समुद्रकिनारा आणि देखण्या परिसरामुळे येथे चित्रपट, मालिका, वेब सिरीज चित्रिकरणासाठी गेल्या काही वर्षांत स्टुडिओ, बंगले उभे राहिले आणि हा पट्टा चित्रिकरणासाठी प्रसिद्ध झाला. मढमधील भाटी, एरंगल, मार्वे गावांत साधारण १००च्या जवळपास स्टुडिओ, बंगले असण्याचा अंदाज स्थानिक व्यक्त करतात. या परिसरात कोळी समाजाचे वर्चस्व आहे. पारंपरिक मत्स्यव्यवसाय करणारा कोळी समाज इथे मोठ्या प्रमाणात आहे. या गावांगावांमध्ये आजही पारंपरिक पद्धतीचाच पेहरावही



दिसतो. या भागांत अन्य उत्पन्नाचे साधन हे कमीच. अशात निसर्गसंपन्न असलेल्या गावांमध्ये गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात चित्रिकरण होऊ लागले. परिणामी गावकऱ्यांनी आपल्या मालकीच्या जमिनींवर बंगले उभारले आणि ते चित्रिकरणासाठी भाड्याने देऊन उत्पन्न कमावू लागले. काहींनी बड्या कंपन्यांना जमिनी विकल्या. त्यामुळे विविध बड्या कंपन्या, कलाकारांनी खरेदी केलेल्या जमिनीचे दाखलेही या भागात मिळतात. मत्स्यव्यवसायातून कमाई आणि जमिनींवर उभे राहिलेल्या स्टुडिओ, बंगल्यांमुळे काहींना आर्थिक सुबत्ता लाभली.

## ॥ अभंगवाणी ॥



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# तर आव्हाडांवर कारवाई करणार!

## देवेंद्र फडणवीसः आव्हाडांच्या वक्तव्यात काही बेकायदेशीर आढळल्यास कारवाई

।अमरावती । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'द केरळ स्टोरी' या चित्रपटावरून देशभरात गदारोळ सुरू झाला आहे. काहींनी या चित्रपटावर आक्षेप घेतला तर काहींनी या चित्रपटाचं समर्थन केलं आहे. 'द केरळ स्टोरी' हा चित्रपट केरळ राज्याविरोधातील प्रोपगंडा असल्याचंही अनेकांनी म्हटलं आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी 'द केरळ स्टोरी' चित्रपटाबद्दल खळबळजनक वक्तव्य केलं. चित्रपट निर्मात्याला फासावर लटकावलं पाहिजे, असं जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. जितेंद्र आव्हाडांच्या या वक्तव्यावर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी प्रतिक्रिया दिली आहे. जितेंद्र आव्हाडांच्या वक्तव्यात काहीही बेकायदेशीर आढळलं तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा थेट इशारा फडणवीसांनी दिला. ते अमरावती येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

"चित्रपट निर्मात्याला फासावर लटकावलं पाहिजे" या जितेंद्र आव्हाडांच्या विधानाबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, "जितेंद्र आव्हाड जर असं बोलले असतील, तर ते अतिशय चुकीचं आहे. अशाप्रकारे बोलणं हे बेकायदेशीर आहे.

प्रसिद्धी मिळवण्यासाठी आणि एका विशिष्ट समाजाचं लांगुलचालन करण्यासाठी ते अशाप्रकारे बोलतात. पण यामुळे इतर समाजात त्यांच्याबद्दल प्रचंड रोष आहे, विशेषत: हिंदू समाजात... हे जितेंद्र आव्हाडांना कळत नाही.

त्याचं वक्तव्य तपासून पाहिलं जाईल, त्यांच्या वक्तव्यात काहीही बेकायदेशीर आढळलं तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल."



### आंबेडकरांच्या विधानावर फडणवीसांची प्रतिक्रिया

प्रकाश आंबेडकरांच्या विधानावर फडणवीसांचं प्रत्युत्तर (फोटो-लोकसत्ता ग्राफिक्स टीम)

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार हे भारतीय जनता पार्टीच्या वाटेवर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. याबाबत स्वत: अजित पवार यांनी प्रसारमाध्यमांसमोर येत स्पष्टीकरण दिलं आहे. जिवात जीव असेपर्यंत आपण राष्ट्रवादी काँग्रेसबरोबरच काम करणार, असं अजित पवारांनी म्हटलं. तरीही अजित पवार भाजपाबरोबर जाण्याच्या चर्चा अद्याप थांबताना दिसत नाहीत.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकरांनी अजित पवारांवर टीकास्त्र सोडलं आहे. अजित पवारांनी दोन वेळा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना फसवलं आहे, असं विधान प्रकाश आंबेडकर यांनी केलं. प्रकाश आंबेडकरांच्या या विधानावर उपमुख्यमंत्री व भाजपा नेते देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिलं. भाजपाची कुणीही फसवणूक करू शकत नाही, असं फडणवीसांनी म्हटलं. ते अमरावती येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

### जितेंद्र आव्हाड नेमकं काय म्हणाले?

» 'द केरळ स्टोरी' चित्रपटातील कथेवर भाष्य करताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, ""द केरळ स्टोरी' चित्रपटाच्या नावाखाली एका राज्याची आणि तेथील महिलांची बदनामी करण्यात आली आहे. धर्मांतर करून इसिस संघटनेत गेलेल्या महिलांचा अधिकृत आकडा तीन आहे, तरीही चित्रपटात हा आकडा ३२ हजार इतका दाखवला आहे. ज्याने या चित्रपटाची निर्मिती केली आहे, त्याला सार्वजनिकरित्या फासावर लटकवलं पाहिजे."

---

# मार्च महिन्यात राज्यातून 2200 मुली बेपत्ता!

## मागील तीन महिन्यात 5 हजार 610 मुली गायब

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकीकडे केरळ फाईल्स या चित्रपटावरुन वातावरण तापलेलं असतांना महाराष्ट्रातली धक्कादायक आकडेवारी पुढे आली आहे. एकट्या मार्च महिन्यामध्ये राज्यातील २ हजार २०० मुली बेपत्ता झाल्या आहेत. तर मागील तीन महिन्यात महाराष्ट्रातून ५ हजार ६१० मुली बेपत्ता झालेल्या आहेत.**

महिला अयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी एक ट्विट केलं आहे. त्यामध्ये त्यांनी राज्यातून मार्च महिन्यात २ हजार २०० मुली बेपत्ता झाल्याचं सांगून गृह विभागाने तातडीने विशेष तपास पथक कार्यरत करावे, अशी मागणी केली आहे. मार्च महिन्यामध्ये सरासरी दररोज 70



मुली गायब झाल्याची धक्कादायक आकडेवारी पुढे येत आहे. बेपत्ता होणाऱ्या मुलींचं वय १८ ते २५ वयोगटातील आहे. जानेवारी ते मार्च या तीन महिन्यामध्ये राज्यातील ५ हजार ६१० तरुणी गायब झाल्या आहेत.

मुलींचं बेपत्ता होण्याची कारणं लग्न, नोकरी, प्रेमाचं आमिष अशी सांगितली जात आहेत. फेब्रुवारी महिन्यात १८१० मुली बेपत्ता झालेल्या आहेत. महत्त्वाचं म्हणजे बेपत्ता झालेल्या मुलींमध्ये अल्पवयीन मुलींचा समावेश नाही. प्रेम प्रकरण अथवा आमिषाला बळी पडून बेपत्ता झालेल्या मुली, महिला यांची संख्या वाढत असल्याने राज्यासमोर मोठं संकट उभं राहिलं आहे.




### अहवाल सरकारला पाठवला- चाकणकर

» मागच्या १६ महिन्यात आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. प्रत्येक पोलिस स्टेशनला मीसिंग सेल आहे. तो कार्यरत आहे की नाही? किंवा त्यांचं काम कसं चालतं, हे पाहाणं गृह विभागाचं काम आहे. यासंदर्भातला अहवाल आम्ही राज्य शासनाला पाठवल्याचं रुपाली चाकणकर यांनी सांगितलं. गृह विभागाने याप्रश्री विशेष पथक स्थापन करण्याची मागणी चाकणकर यांनी केली आहे.

# चोरी करण्यासाठी गुजरातहून मुंबईत यायचे, मुंबई पोलिसांना संशय आला, प्लान आखला अन् इंगा दाखवला

।मुंबई। महाईन्यूज ।

विलेपार्ले पोलिसांनी मुंबईत सोनसाखळी चोरी करणाऱ्या दोघांना गुजरातमध्ये जाऊन अटक केली. हे दोघे अट्टल गुन्हेगार असून गुजरातमधून ट्रेनने मुंबईत येतात आणि पश्चिम उपनगरांत चोऱ्या करतात. एखाद्या रेल्वे स्थानकाबाहेर उतरल्यानंतर दोघे दुचाकी चोरतात आणि त्यावरून सोनसाखळ्या चोऱ्या करतात.

विलेपार्ले येथील वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची साखळी घेऊन पळाले होते. दोघांवर दोन डझनपेक्षा अधिक गुन्हे आहे. हे दोघे शिताफीने दुचाकींची चोरी करत असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. विलेपार्ले परिसरात वृद्ध महिला एप्रिलमध्ये डॉक्टरकडे जात होत्या. त्याचवेळी अचानक दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन घेऊन सुसाट वेगाने पळ काढला. विलेपार्ले पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. घटनास्थळावरील सीसीटीव्हीच्या माध्यमातून चोरांचा माग घेत असताना दोघेजण चोरी केल्यानंतर दुचाकीवरून अंधेरी स्थानकाजवळ गेले. या ठिकाणी दुचाकी पार्क करून वांद्रे स्थानकात रेल्वेने आणि तेथून टॅक्सीने मुंबई सेंट्रल स्थानकात पोहोचल्याचे आढळले. दोघेही सौराष्ट्र एक्सप्रेसने वापी येथे गेले. वापी स्थानकातून रिक्षा पकडून जात असल्याचे सीसीटीव्हीमधून दिसले.

रेल्वेमध्ये सीसीटीव्हीची एक अद्ययावत यंत्रणा लावण्यात आलेली आहे. सीसीटीव्ही मिळालेले चेहरे या यंत्रणेत अपलोड करण्यात आले. त्यानुसार यातील एक आरोपी बोरिवली स्थानकात नजरेस पडला. हा आरोपी मुंबईतून गुजरातमध्ये अशाच मार्गाने प्रवेश करीत असल्याचे दिसत होते.


पोलिसांनी वापी येथील खबरे कामाला लावले आणि त्यांना दोन आरोपींचे फोटो दिले. त्यावरून या दोन आरोपींची नावे शाहिद कपाडिया आणि भौमिक त्रिवेदी असल्याचे कळले. पोलिसांनी त्यांच्या मुंबई गुजरात मार्गावर नजर ठेवली त्यावेळी दोघे वापीसाठी निघाल्याचे दिसून आले. त्यानुसार पोलिसांनी वापी येथे सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले.

# पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना अटक!

## पाकिस्तानात हिंसाचार, देशभरात दंगली; समर्थकांचा लष्करी मुख्यालयावर हल्ला

। इस्लामाबाद । महाईन्यूज ।

**पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि माजी क्रिकेटपटू इम्रान खान यांना पाकिस्तानी रेंजर्सकडून अटक करण्यात आली आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून ही अटक करण्यात आली आहे. खान यांना इस्लामाबाद येथील कोर्टाबाहेरून अटक करण्यात आली आहे**



पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना इस्लामाबाद उच्च न्यायालयाबाहेर मंगळवारी अटक करण्यात आल्यानंतर पाकिस्तानात प्रचंड हिंसाचार उफाळला आहे. खान यांचे समर्थक रावळिपडीच्या लष्करी मुख्यालयामध्ये घुसले असून पेशावर, फैजलाबाद, क्वेट्टा या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात दंगली उसळल्या आहेत. खान यांच्या अटकेचे वृत्त पसरताच संपूर्ण पाकिस्तानात तणावाचे वातावरण आहे.

डॉन वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार इम्रान खान यांना अल कादिर ट्रस्ट प्रकरणात ही अटक करण्यात आली आहे. अटकेबाबत अधिक तपशील अद्याप मिळालेला नाही. इम्रान खान उच्च न्यायालयात बायोमेट्रिक व्हेरिफिकेशनसाठी आले होते, तेव्हा पाकिस्तानी रेंजर्सकडून ही कारवाई करण्यात आली. पाकिस्तान तहरीक ए इन्साफ (पीटीआय)चे नेते मुसर्रत चीमा यांनी दावा केला आहे की इम्रान खान यांना टॉर्चर केले जात आहे. पक्षाने असाही दावा केला आहे की खान यांच्या वकीलाला मारहाण देखील झाली आहे आणि ते गंभीर जखमी झाले आहेत.

इम्रान खान यांची अटक लाहोरमधील रॅलीनंतर झाली आहे ज्यात त्यांनी लष्करावर गंभीर आरोप केले होते. या रॅलीत इम्रान यांनी माजी राष्ट्रपती आसिफ अली झरदारी आणि विदेश मंत्री बिलावल भुट्टो यांच्यावर हल्ला चढवला होता. इम्रान खान यांना अटक झाल्यानंतर इस्लामाबाद पोलिसांनी ट्विट करून खान यांना कादिर ट्रस्ट प्रकरणात अटक करण्यात आल्याचे सांगण्यात आले. पीटीआयचे उपाध्यक्ष फवाद चौधरी यांनी ट्विट करून सांगितले की, इम्रान खान सध्या उच्च न्यायालयात रेंजर्सच्या ताब्यात आहेत आणि वकिलांना टॉर्चर केले जात आहे. इम्रान खान यांच्या गाड्यांना घेरण्यात आले होते. दरम्यान पीटीआयचे अन्य एक नेता अजहर मशवानीने आरोप केला आहे की, इम्रान यांचे रेंजर्सनी अपहरण केले आहे. त्यांनी देशभरातील पक्षाच्या कार्यकर्त्यांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. इम्रान खान यांच्या अटकेच्या आधी पंतप्रधान शहबाज शरीफ आणि पाकिस्तान पिपल्स पार्टीचे सह अध्यक्ष आसिफ अली झरदारी यांनी खान यांनी लष्करावर केलेल्या गंभीर आरोपाची निंदा केली होती. पीटीआयच्या प्रमुखाने देशातील संस्थांना बदनाम करण्यासाठी खालची पातळी गाठली आहे, अशी टीका झरदारी यांनी केली.

मंगळवारी सकाळी खान हे लाहोरहून राजधानी इस्लामाबादला आले होते. एका खटल्याच्या प्रकरणी उच्च न्यायालयात त्यांची 'बायोमॅट्रिक' माहिती जमा केली जात असतानाच 'रेंजर्स' या निमलष्करी दलाचे जवान काच तोडून आत घुसले आणि त्यांनी खान यांना खेचत गाडीत बसविल्याचा आरोप पाकिस्तान तहरीक ए इन्साफ (पीटीआय) पक्षाच्या नेत्या शिरीन मझारी यांनी केला. पाकिस्तानच्या 'नॅशनल अकाउंटेबिलिटी ब्युरो'ने (एनएबी) बांधकाम व्यावसायिक मलिक रियाझ यांना जमीन हस्तांतरण केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात असले तरी खान सध्या कुठे आहेत, याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

### उच्च न्यायालयाचे ताशेरे

» खान यांना उच्च न्यायालयातून झालेल्या अटकेबद्दल मुख्य न्यायाधीशांनी पोलिसांना जाब विचारला आहे. इम्रान खान यांना कोणत्या प्रकरणात आणि अशा पद्धतीने का अटक केली, याची माहिती प्रत्यक्ष हजर होऊन द्यावी, असे आदेश इस्लामाबादच्या पोलीस प्रमुखांना न्यायालयाने दिले. अन्यथा पंतप्रधानांना समन्स बजाविण्याचा इशाराही न्यायाधीशांनी दिला. त्यानंतर पोलीस महासंचालकांनी न्यायालयात हजर होत वॉरंट दाखविले आणि एनएबीने अटक केल्याची माहिती दिली.

### लष्करावरील आरोपांमुळे कारवाई?

» इम्रान खान यांनी सोमवारी एका लष्करी अधिकाऱ्यावर आपल्याला जीवे मारण्यासाठी कट रचल्याचा आरोप केला होता. लष्कराने या आरोपांचे खंडन केले असले तरी दुसऱ्याच दिवशी झालेल्या या कारवाईमुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे खान यांना अटक करणारे 'रेंजर्स' गृहमंत्रालयाच्या अखत्यारीत येत असले, तरी या दलाचे वरिष्ठ अधिकारी लष्करातील असतात.

---

## मणिपूरमध्ये हिंसाचाराचा आगडोंब; मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली चिंता!

। मणिपूर । महाईन्यूज ।

मणिपूरमध्ये मैतेई समुदायाला अनुसूचित जातीचा दर्जा देण्याच्या निर्णयाविरुद्ध झालेल्या आंदोलनादरम्यान हिंसाचाराची घटना घडली होती. या घटनेत आतापर्यंत ६० जणांचा मृत्यू झाला असून १७०० घरे जाळण्यात आल्याची माहिती मणिपूरचे मुख्यमंत्री एस. बिरेन सिंह यांनी दिली आहे. तसेच मणिपूरमध्ये सध्या तणावपूर्ण शांतात असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रयत्न सुरू असल्याचेही ते म्हणाले. सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी या संदर्भात प्रतिक्रिया दिली.

मणिपूरमध्ये ३ मे रोजी हिंसाचाराची घटना घडली होती. या घटनेत आतापर्यंत ६० जणांचा मृत्यू झाला असून २३१ जण गंभीर जखमी झाले आहेत. तसेच या हिंसाचारादरम्यान १७०० घरे जाळण्यात आली असून आतापर्यंत २० हजार नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. तर १० हजार नागरिक अद्यापही अडकले आहेत, अशी माहिती एस. बिरेन सिंह यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी मणिपूरमधील नागरिकांना शांततेचे आवाहनही केले. मणिपूरमध्ये सध्या तणावपूर्ण शांतता असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांनी कृपया शांतता राखावी, असे ते म्हणाले. दरम्यान, या हिंसाचाराबाबत सर्वोच्च न्यायालयानेही चिंता व्यक्त केली असून वांशिक हिंसाचाराचा फटका बसलेल्यांची सुरक्षा, तसेच मदत व पुनर्वसनाचे प्रयत्न वाढवण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, असे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने केंद्र व मणिपूर सरकारला दिले आहेत. इम्फाळ खोऱ्यातील काही भागांत जनजीवन सुरळीत झाले.

## पंतप्रधान मोदी यांच्याविरोधात काँग्रेसची तक्रार

### प्रचार संपल्यानंतर दिलेल्या संदेशावरून वाद

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी आज, बुधवारी मतदान होत असताना त्याच्या आदल्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटकच्या जनतेला संदेश दिला आहे. खुले पत्र, तसेच समाजमाध्यमातून ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून दिलेल्या या संदेशात राज्याच्या विकासासाठी भाजप कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली आहे. मात्र यामुळे आचारसंहितेचा भंग झाला असल्याची तक्रार काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे नोंदविली आहे.**




कर्नाटकला पहिल्या क्रमांकाचे विकसित राज्य बनवण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी दूरचित्रवाणी संदेशात केले आहे. केंद्रात व राज्यामध्ये डबल इंजिन सरकार असेल तर, विकासालाही गती मिळेल, असा प्रचार भाजपने केला होता. हाच धागा पकडत मोदींनी कर्नाटकच्या जनतेला मतदानाच्या पूर्वसंध्येला संदेश दिला आहे. 'स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी कालखंडामध्ये भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी कर्नाटक नेतृत्व करण्यास उत्सुक असल्याची मला कल्पना आहे. भारत ही पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला तिसऱ्या क्रमांकावर पोहोचवण्याचे आपले उद्दिष्ट आहे. पण, कर्नाटकची अर्थव्यवस्था झपाट्याने विस्तारून १ हजार कोटी डॉलर इतकी झाली तरच हे शक्य होईल. करोनाकाळात कर्नाटकात वार्षिक ९० हजार कोटी रुपयांहून अधिक परदेशी गुंतवणूक झाली. काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात ती फक्त ३० हजार कोटी इतकीच होती,' असा उल्लेख पंतप्रधानांनी केला आहे.

# इडी कार्यालयात नोरा; चौकशीचा ससेमिरा काही थांबेना



अभिनेत्री आणि डान्सर नोरा फतेही कॉनमन सुकेश चंद्रशेखरच्या 200 कोटी रुपयांच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात चांगलीच अटकली आहे. याप्रकरणामूळे तिची इडीच्या अधिकाऱ्यांनकडून चौकशी सुरु आहे. या चौकशीसाठी दिल्लीतील ईडी कार्यालयात ती दाखल झाली आहे. नोराची याआधीही अनेकवेळा चौकशी करण्यात आली आहे आणि पुराव्यांच्या आधारे तिला बोलावण्यात आले आहे. नोराला सुकेश चंद्रशेखर यांच्या बद्दल विचारण्यात येईल आणि प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंडरिंग कायद्याच्या (पीएमएलए) कलमांतर्गत तिचा जवाब नोंदविला जाइल असं पीटीआयने म्हटले आहे. तर नोरा साक्षीदार म्हणून तपास यंत्रणेला मदत करत असल्याचं तिच्या प्रवक्त्याने म्हटलं आहे. या प्रकरणी नोरा फतेहीशिवाय जॅकलिन फर्नांडिसचीही चौकशी करण्यात आली आहे. ईडीने आपल्या आरोपपत्रात अभिनेत्रीचे नाव आरोपी म्हणून ठेवले होते. गेल्या महिन्यात जॅकलिनला 2 लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तेवढ्याच रकमेच्या जामीनावर जामीन मंजूर करण्यात आला होता. तसेच या आठवड्याच्या सुरुवातीला, पोलिसांनी पिंकी इराणीला अटक केली होती, तिने जॅकलीन फर्नांडिसची सुकेश चंद्रशेखरशी ओळख करून दिली होती. ईडीच्या म्हणण्यानुसार, जॅकलिन फर्नांडिस आणि नोरा फतेही यांना कथित आरोपी सुकेश चंद्रशेखरकडून अनेक आलिशान कार आणि इतर



# सवत माझी लाडकी म्हणत अक्षयाने शेअर केला हार्दिकसोबत तिचा फोटो

मुंबई- छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेता हार्दिक जोशी आणि अभिनेत्री अक्षया देवधर यांनी आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. ऑनस्क्रीन पती-पत्नी असलेले हे दोघे खऱ्या आयुष्यातही लग्नबंधनात अडकले. त्यांच्या या निर्णयाने चाहते प्रचंड आनंदी झाले. आता कुठे त्यांच्या सुखी संसाराची सुरुवात झाली. मात्र अक्षयाने शेअर केलेल्या त्या फोटोने चाहत्यांचं कुतूहल वाढवलं आहे. अक्षया कायमच तिचे आणि हार्दिकचे फोटो चाहत्यांसोबत शेअर करत असते. त्यांच्या लग्नानंतरचं सुखी आयुष्य पाहायला चाहतेही उत्सुक असतात. मात्र तिने शेअर केलेल्या एका फोटोने चाहते बुचकळ्यात पडले आहेत. तिने हार्दिकचा एका मुलीसोबतचा फोटो शेअर केला आहे. महत्वाचं म्हणजे त्या फोटोसोबत तिने 'सवत माझी लाडकी' असं कॅप्शनपण दिलं आहे.



त्यामुळे ही मुलगी नक्की कोण असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे.

नुकताच अक्षयाने तिच्या इन्स्टग्राम स्टोरीवरून एक खास फोटो शेअर केला होता. 'सवत माझी लाडकी' असा हॅशटॅग देत तिने हार्दिकसोबत असलेल्या एका मैत्रिणीचा फोटो शेअर करून त्यांच्यातील बॉंडिंग कसं आहे याचा खुलासा केला. माझ्या ही मुलगी नक्की कोण असा प्रश्न अनेकांना पडला. अक्षया ज्या मुलीबद्दल बोलतेय ती सवत म्हणजे मुक्ता लेले होय. मुक्ता लेले ही उत्कृष्ट नृत्यांगना आहे. तिने काही चित्रपटातून भूमिका साकारल्या आहेत. अक्षया आणि मुक्ता या खूप चांगल्या मैत्रिणी आहेत. अभिनयाची आवड या दोघींना एकत्र घेऊन आली. त्या दोघींची मैत्री घट्ट होतीच मात्र अक्षयाच्या लग्नानंतरही त्यांची मैत्री तितकीच घट्ट राहिली. महत्वाचं म्हणजे आता मुक्ता हार्दिकची देखील खूप चांगली मैत्रीण झाली आहे. त्यामुळे तिने त्यांच्या फोटोला सवत माझी लाडकी असं कॅप्शन दिलं आहे.

# अनेक वर्ष मोठ्या पडद्यापासून का दूर होत्या वर्षा उसगांवकर?

अनेक वर्ष आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक म्हणजे वर्षा उसगांवकर. उत्तमोत्तम चित्रपट, नाटकं आणि मालिकांमध्ये काम करत अनेक वर्ष त्यांनी प्रेक्षकांना भुरळ घातली. परंतु गेली काही वर्ष त्या मोठ्या पडद्यावर झळकल्या नाहीत. मधल्या काळात त्या छोट्या पडद्यावर सक्रिय होत्या. परंतु त्या वर्षात त्या चित्रपटात का काम करत नाहीत, असा प्रश्न प्रेक्षकांना पडला होता. अखेर त्यांनी स्वतः याचं कारण उघड केलं आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'हवाहवाई' चित्रपटाच्या निमित्ताने त्यांनी आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीमने 'लोकसत्ता डिजीटल अड्डा'वर हजेरी लावली आणि मनमोकळ्या गप्पा मारल्या. त्यावेळी बोलताना वर्षा उसगांवकर यांनी चित्रपटसृष्टीपासून दूर राहण्याचं कारण सांगितलं. त्या म्हणाल्या, "चित्रपटात काम करण्याची माझी खूप इच्छा होती, पण कणा असलेल्या भूमिकाच मला विचारण्यात आल्या नाहीत. एक दिवसाची, दोन दिवसाची, दहा दिवसाची भूमिका मला ऑफर होत होत्या." पुढे त्यांनी त्यांना गेल्या काही वर्षांत आलेले निर्माता – दिग्दर्शकांचे अनुभवही सांगितले. त्या म्हणाल्या, "एक निर्माता माझ्याकडे एका चित्रपटाची कथा ऐकवायला आला. त्याने कथा ऐकवायला सुरुवात केली. तो म्हणाला, "तुम्ही हिरोच्या आई असता...तुम्ही अमेरिकेहून येता" आणि पुढे तो कथा विसरला. मला आश्चर्य वाटलं. मी अमेरिकेहून भारतात येऊन काय करते, हेच जर दिग्दर्शक विसरत तर मी अशी भूमिका का करायची? काम करण्याच्या समाधानाबरोबरच पैसे मिळवणंही महत्वाचं असलं तरी पैशासाठी मी चित्रपटांच्या कथेच्या बाबतीत तडजोड करणार नाही." दरम्यानच्या काळात त्यांनी जे मराठी चित्रपट केले ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचले नाहीत.



# पन्नाशी गाठली पण तिचं सौंदर्य कमी होईना!

आप जैसा कोई मेरे जिंदमी मैं आये तो बात बन जाये.... नावाचे गाणे मलायकाच्या भूमिकेत व्हायरल झाले. तिनं या गाण्यामध्ये केलेला डान्स प्रेक्षकांना कमालीचा आवडला आहे. त्यावरुन नेटकऱ्यांनी तिचं कौतूकही केलं आहे. मलायका ही सोशल मीडीयावर तिच्या बोल्डनेससाठी ओळखली जाणारी अभिनेत्री आहे. सध्या मलायका चर्चेतला चेहरा आहे, वेगवेगळ्या पार्ट्यांमध्ये मलायका ही व्हायरल होताना दिसते. त्यावर तिला नेटकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रियाही चर्चेचा विषय आहेत. मलायकाचा फॅशन सेन्स हा अजब आहे. त्यामुळेच ती लाईमलाईटमध्ये असते. तिच्या इंस्टावरुन व्हायरल झालेल्या फोटोंना त्यांची पसंती मिळताना दिसते. कोरोनाच्या काळात मलायकानं चाहत्यांना फिटनेसचे महत्व सांगत योगासनाचे धडे दिले होते. आजच्या घडीला बॉलीवूडमधील सर्वात बोल्ड सेलिब्रेटी म्हणून मलायकाचे नाव घेता येईल. मलायका आता पन्नाशीच्या जवळ आली आहे. अशावेळी तिचं ग्लॅमर, तिचं चर्चेत राहणं हे सारं प्रभावित करणारं आहे.



फिटनेस फ्रीक म्हणून मलायकाचा बोलबाला आहे. सध्या तिचा एक व्हिडिओ व्हायरल होतो आहे. त्यामध्ये ती एका पार्टीमध्ये सहभागी झाली आहे. आणि त्यात उपस्थित फोटोग्राफर्सची तिची छबी टिपण्यासाठी चाललेली लगबग दिसून येते आहे. यावेळी मलायकानं देखील पोझ देत फोटोग्राफर्सला खुश केले आहे. तिचे ते फोटो पाहून नेटकऱ्यांनी त्यावर दिलेल्या प्रतिक्रिया खास आहेत. मलायकाचा तो कॅटलूक चाहत्यांना कमालीचा

# आमिर खानच्या 'या' सुपरहिट चित्रपटाचा येणार सिक्वेल

गेल्या काही वर्षात अनेक गाजलेल्या चित्रपटांचे सिक्वेल बॉलिवूडमध्ये तयार करण्यात आले. यात 'गोलमाल', 'सिंघम', 'धूम' अशा सुपरहिट चित्रपटांचा समावेश आहे. अशातच आता आणखी एका लोकप्रिय चित्रपटाचा दुसरा भाग येणार आहे. हा चित्रपट म्हणजे आमिर खानचा 'गजनी.' मूळ तमिळमध्ये बनलेल्या 'गजनी' या चित्रपटात सुरिया, असिन आणि नयनतारा मुख्य भूमिकेत होते. तीन वर्षांनंतर, म्हणजेच २००८ मध्ये या चित्रपटाचे दिग्दर्शक मुर्गदास यांनी या चित्रपटाचा हिंदी रिमेक केला. या हिंदी रिमेकमध्ये आमिर खान आणि असिनसह जिया खान हे कलाकार प्रमुख भूमिकेत होते. शॉर्ट टर्म मेमरी लॉस या आजारावर बेतलेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनावर लॉन्ग टर्म गारुड केलं होतं. खुद्द आमिर याच्या प्रमोशनसाठी रस्त्यावर उतरून लोकांना खास गजनी



# मुंबई इंडियन्ससाठी एक गुड न्यूज!

## आयपीएल 2023 : विजयानंतर 12 गुणांसह त्यांनी गुणतालिकेत तिसरे स्थान पटकावले

| कोलकाता |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**मुंबई मुंबई इंडियन्सने यावेळी आरसीबीवर दणदणीत विजय साकारला. मुंबईने एवढा मोठा विजय मिळवला आणि त्यामुळेच त्यांच्यासाठी अजून एक गुड न्यूज आली आहे. या सामन्यापूर्वी मुंबईच्या संघाने १० सामने खेळले होते. या १० सामन्यांमध्ये मुंबईच्या संघाने पाच सामने जिंकले होते, तर पाच सामन्यांमध्ये त्यांना पराभव पत्करावा लागला होता. मुंबईने यावेळी पाच सामन्यांतील विजयासह १० गुण कमावले होते. या १० गुणांसह मुंबईचा संघ हा आठव्या स्थानावर होता. हा सामना जिंकून दोन गुण कमावण्याचे स्वप्न यावेळी मुंबईचा संघ पाहत होता. सूर्याच्या ८३ आणि नेहास वधेराच्या नाबाद ५२ धावांच्या खेळीच्या जोरावर मुंबई इंडियन्सने सहा विकेट्स राखत विजय साकारला. या विजयानंतर मुंबईसाठी अजून एक गुज न्यूज संघाला मिळाली आहे. या विजयानंतर मुंबईच्या संघाचे १२ गुण झाले आहे.**




या १२ गुणांसह त्यांनी गुणतालिकेत तिसरे स्थान पटकावले आहे. मुंबईने थेट आठव्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर गरुडभरारी घेतली आहे. त्यामुळे मुंबई एकाच विजयानंतर चार संघांना पिछाडीवर ढकलले आहे. मुंबईच्या चाहत्यांसाठी ही सर्वात मोठी गुड न्यूज असणार आहे.

आरसीबीच्या संघाने या सामन्यापूर्वी १० सामने खेळले होते. आरसीबीने १० पैकी पाच विजय मिळवले होते, तर पाच पराभव त्यांच्या पदारात पडलेले होते. त्यामुळे पाच विजयांसह त्यांचेही मुंबई इंडियन्ससारखेच १० गुण होते. पण आरसीबीचा नेट रनरेट हा मुंबईपेक्षा चांगला होता. त्यामुळे ते सहाव्या स्थानावर होते.

हा सामना जो संघ जिंकणार होता त्यांना दोन गुण मिळणार होते. या दोन गुणांसह विजेत्या संघाचे १२ गुण होणार आहे. या १२ गुणांसह विजेता संघ हा थेट तिसऱ्या स्थानावर पोहोचणार होता. त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा विजय सर्वात महत्वाचा होता. दुसरीकडे जो संघ या सामन्यात पराभूत होणार होता त्याचे प्ले ऑफमध्ये पोहोचण्याची संधी कमी होणार होती.

कारण पराभूत संघाला यानंतर तीनपैकी तिन्ही सामने जिंकावे लागणार होते. पण हे तिन्ही सामने जिंकूनही त्यांचा प्ले ऑफमध्ये प्रवेश निश्चित होणार नव्हता. तीन सामने जिंकूनही सर्व गोष्ट जर-तर या गोष्टींवरच येणार होती. त्यामुळे त्यांच्यासाठी नेट रनरेट महत्वाचा ठरणार होता.

मुंबईत सामना जिंकला आणि बंगळुरुत फटाके फुटले; स्वतःसाठी जमलं नाही ते आरसीबीसाठी केलं मुंबई आणि आरसीबी या दोन्ही संघांसाठी तसं पाहिल्यास हा सामना करो या मरो असाच होता.

### याला म्हणतात रोहितची कॅप्टन्सी

**आरसीबीच्या ग्लेन मॅक्सवेल आणि फॅफ ड्यु प्लेसिस यांनी तुफानी फटकेबाजी केली. पण त्यानंतरही मुंबई इंडियन्सला आरसीबीच्या धावसंख्येवर अंकुश ठेवता आल्याचे पाहायला मिळाले. रोहित शर्माने या सामन्यात नेमकं असं केलं तरी काय, हे आता समोर आले आहे. मुंबई इंडियन्सने या सामन्याची झकास सुरुवात केली. कारण पहिल्याच षटकात मुंबई इंडियन्सने विराट कोहलीचा काटा काढला होता. कोहलीला सुरुवातीला पंचांनी नाबाद ठरवले होते. पण रोहित शर्माने यावेळी डीआरएस घेतला आणि तिसऱ्या पंचांकडे हा निर्णय गेला. तिसऱ्या पंचांनी यावेळी रिप्ले पाहिला आणि त्यामध्ये कोहली बाद असल्याचा निर्णय त्यांनी दिला.**

**त्यामुळे रोहितच्या या अचूक निर्णयाचा फायदा मुंबई इंडियन्सला झाला. त्यानंतर रोहित शर्माने अनुज रावतला जास्त काळ फलंदाजी करू दिली नाही आणि त्याला बाद करत तंबूचा रस्ता दाखवला. त्यानंतर काही काळ मुंबई इंडियन्ससाठी वाईट होता. कारण त्यानंतर ग्लेन मॅक्सवेल आणि फॅफ ड्यु प्लेसिस मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजीवर तुटून पडत होते. पण रोहितने हार मानली नाही. रोहितने त्यावेळी गोलंदाजीत असे काही बदल केले की, त्यामुळे मॅक्सवेल आणि फॅफ या दोघांपैकी एकालाही शतकासमीप पोहोचता आले नाही.**

**रोहितने बर्डनहॉफच्या गोलंदाजीचा चांगला वापर केला आणि त्याने सुरुवातीला मॅक्सवेलला बाद केले. त्यानंतर फॅफ जास्त स्कुपचे फटके मारतो, हे रोहितला माहिती होते. पण बर्डनहॉफची चार षटकं संपली होती. त्यामुळे रोहितने दुसरी खेळी खेळली आणि त्याने कॅमेरून ग्रीनला गोलंदाजीसाठी आणले. रोहितची ही चालही यावेळी यशस्वी ठरली. मॅक्सवेलने यावेळी ३३ चेंडूंच आठ चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर ६८ धावांची खेळी साकारली, तर फॅफने ४१ चेंडूंत पाच चौकार आणि तीन षटाकारांच्या जोरावर ६५ धावांची खेळी साकारली. पण या दोघांनी मोठी खेळी साकारल्यावर आरसीबीचा संघ २०० धावांचा पल्ला सहज गाठेल असेल वाटत होते. पण तसे यावेळी घडले नाही आणि त्याचे श्रेय रोहितलाही द्यावे लागेल.**

---

## मुंबई इंडियन्सच्या संघात डेथ ओव्हर स्पेशालिस्ट गोलंदाजाची एन्ट्री

| मुंबई |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

आज ९ मे रोजी मुंबई इंडियन्स आरसीबीविरुद्ध आपला आयपीएलमधील महत्त्वाचा सामना खेळणार आहे. मुंबईच्या संघाला यंदाच्या आयपीएलमध्ये टिकून राहायचे असेल तर हा समान संघासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारा आहे. पण स्पर्धेच्या मध्यातच मुंबई इंडियन्सला मोठा धक्का बसला आहे. वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरची फिटनेसची चिंता संपलेली नाही आणि त्यामुळे तो पुनर्वसनासाठी त्याच्या घरी परतणार आहे. अशाप्रकारे जोफ्रा आर्चर उर्वरित आयपीएलमधून बाहेर पडला आहे. पाच वेळा आयपीएल चॅम्पियन मुंबई इंडियन्सने जोफ्रा आर्चरच्या जागी इंग्लिश अष्टपैलू खेळाडू ख्रिस जॉर्डनला करारबद्ध केले आहे.

जॉर्डनने २०१६ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केले होते आणि त्याने आतापर्यंत २८ सामन्यांत २७ विकेट घेतले आहेत. या वेगवान गोलंदाजाने ८७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ९६ विकेट घेतल्या आहेत. मुंबई इंडियन्सने ख्रिस जॉर्डनला त्याची मूळ किंमत २ कोटी रुपयांसह करारबद्ध करत संघात घेतले आहे. हा खेळाडू आतापर्यंत आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू, सनरायझर्स हैदराबाद, पंजाब किंग्ज आणि चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून खेळताना दिसला आहे. मुंबई इंडियन्सने अधिकृत घोषणा करत म्हटले आहे, "ख्रिस जॉर्डन आयपीएलच्या उर्वरित हंगामासाठी मुंबई इंडियन्स संघात सामील होणार आहे. आर्चरची जागा ख्रिस जोफ्रा घेत आहे. जोफ्राच्या रिकव्हरी आणि फिटनेसवर इंग्लंड क्रिकेट बोर्डाकडून लक्ष ठेवले जात आहे. त्याच्या पुनर्वसनावर लक्ष केंद्रित करण्यासाठी तो मायदेशी परतेल.'

---

## रिंकूने तर स्टंपतोड गोलंदाजालाही सोडले नाही!

### विनिंग चौकारानंतर अर्शदीपच्या आलं डोळ्यात पाणी

| कोलकाता |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**आयपीएल २०२३मध्ये रिंकू सिंगचे नशीब बलवत्तर आहे. तो मैदानात म्हणजे केकेआरचा विजय निश्चित मानला जात आहे. त्याने पंजाबविरुद्ध शेवटच्या चेंडूवर चौकार मारून संघाला विजय मिळवून दिला. यानंतर गोलंदाज अर्शदीप सिंगच्या डोळ्यात अश्रू दिसले.**



मुंबई इंडियन्सविरुद्ध स्टंपतोड गोलंदाजी करत जगाला वेड लावणाऱ्या अर्शदीप सिंगची जादू कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध चालली नाही. सोमवारी ८ मे ला झालेल्या पंजाब किंग्ज विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स सामन्यात शेवटच्या षटकातील शेवटच्या चेंडूवर रिंकू सिंगने अर्शदीपविरुद्ध चौकार लगावल्याने पंजाब किंग्जला पराभूत व्हावे लागले. रिंकू सिंगच्या बॅटला लागून चेंडू सीमारेषा ओलांडताच अर्शदीप सिंग निराश होऊन जमिनीवर बसला. या विजयासह केकेआरने प्ले ऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. रिंकू सिंगच्या विजयी चौकारानंतर अर्शदीपच्या डोळ्यात अश्रू आल्याचे सोशल मीडियावर म्हटले जात आहे. सामन्यानंतरचे जे फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत, त्यामध्ये त्याचा चेहरा पडलेला आहे तर काही फोटोमध्ये त्याच्या डोळ्यात अश्रूही दाटून आले आहेत. अर्शदीपने आपला सर्वतोपरी प्रयत्न केला आणि पण तो सफल होऊ शकला नाही. अखेरच्या षटकात मुंबईविरुद्धच्या सामन्याला वेगळेच वळण देणाऱ्या अर्शदीपने या षटकात रसेलला धावबाद केले, पण तो रिंकूला विजयी चौकार मारण्यापासून रोखू शकला नाही.

### काय म्हणाला पंजाबचा कर्णधार

सामन्यानंतर पंजाबचा कर्णधार धवन म्हणाला, 'चांगलं नाही वाटतंय. आम्ही सामना गमावला आणि फलंदाजी करणे ही सोपी विकेट नव्हती आणि मला वाटते की आम्ही चांगली धावसंख्या उभारली. सामन्याच्या शेवटी त्यांनी चांगला खेळ दाखवला.' वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगला विजयासाठी शेवटच्या षटकात सहा धावा करण्यापासून केकेआरला रोखायचे होते. त्याने शेवटच्या चेंडूपर्यंत सामना आपल्या ताब्यात ठेवला मात्र तो आपल्या संघाला पराभवापासून वाचवू शकला नाही. धवनने अर्शदीपचे कौतुक करताना म्हटले की, "शेवटचे षटक शानदार होते, अर्शदीपचे उत्कृष्ट प्रयत्न आणि मागच्या सामन्यानंतर त्याने ज्याप्रकारे कमबॅक केले आहे, त्याचे सर्व श्रेय त्याला जाते. शेवटच्या चेंडूपर्यंत त्याने सामना नेला हे विशेष. ते खरोखर चांगले होते."